खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

## हुतात्मा राजगुरू यांना अभिवादन



केसरी

किरण खुडे (पत्रकार)

### हुतात्मा राजगुरु यांना अभिवादन

**राजगुरूनगर : (वार्ताहर) :** भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिवीर हुतात्मा शिवराम हरी राजगुरू, भगतसिंग, सुखदेव यांच्या ९५ व्या स्मृतिदिनामित राजगुरूनगर येथे अभिवादन कार्यक्रम झाला.

येथील राजगुरूनगर एसटी बसस्थानक आवारातील हुतात्मा राजगुरु, भगतसिंग व सुखदेव यांच्या स्मृती शिल्पांना विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करित अभिवादन केले. यावेळी पुणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, बाजार समितीचे सभापती तथा जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे पाटील, पंचायत समितीच्या सभापती विद्या मोहिते, उपसभापती मंगेश सांवत, दिलीप डुबे, राजगुरुनगर सहकारी बँकेचे अध्यक्ष सागर पाटोळे, संचालक विजया शिंदे, विनायक घुमटकर, मुकुंद आवटे, राजगुरू प्रतिष्ठानचे अध्यक्ष कोंडीभाऊ टाकळकर आदी उपस्थित होते.

दरम्यान, आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते यांनी हुतात्म्यांच्या शिल्पांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. हुतात्मा राजगुरू यांचे जन्मस्थान असलेल्या राजगुरू वाड्यावर अभिवादन कार्यक्रम झाला. पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या हस्ते वाड्यावर ध्वजारोहण झाले. यावेळी प्रांताधिकारी अनिल दौंडे, जिल्हा परिषद सदस्या दिप्ती भोगाडे, तनुजा घनवट, नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर, राजगुरू स्मारक समितीचे अध्यक्ष अतुल देशमुख, सुशील मांजरे, नरेंद्र गायकवाड, शैलेश रावळ, संदिप वाळूंज, नितिन शहा, स्व. बाळासाहेब आपटे स्मृती समितीचे स्वानंद खेडकर यावेळी उपस्थित होते.

लोकमत



हुतात्म्यांच्या स्मृती शिल्पांना अभिवादन करताना जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील व मान्यवर.

# खेडमध्ये राजगुरू, भगतसिंग, सुखदेव यांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर** : शहीद दिनानिमित्त भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील प्रमुख क्रांतिवीर हुतात्मा शिवराम हरी राजगुरू, भगतसिंग, सुखदेव यांच्या ९५ व्या स्मृतिदिनानिमित्त राजगुरूनगर येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. राजगुरूनगर एसटी स्थानकावरील हुतात्मा राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव यांच्या स्मृती शिल्पांना विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

याप्रसंगी पुणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, बाजार समितीचे सभापती आणि जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे, पंचायत समितीच्या सभापती विद्या मोहिते, उपसभापती मंगेश सांवत, दिलीप डुबे, राजगुरूनगर सहकारी बँकेचे अध्यक्ष सागर पाटोळे, संचालक विजयाताई शिंदे, विनायक घुमटकर, मुकुंद आवटे, राजगुरू प्रतिष्ठानचे अध्यक्ष कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, सुभाष होले, रेखाताई क्षोत्रीय, सुदाम कराळे, बाजार समितीचे संचालक सयाजी मोहिते, वैभव नाईकरे आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, आमदार बाबाजी काळे आणि माजी आमदार दिलीप मोहिते यांनी हुतात्म्यांच्या शिल्पांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. हुतात्मा राजगुरू यांच्या जन्मस्थान असलेल्या राजगुरू वाड्यावर अभिवादन कार्यक्रम झाला. पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या हस्ते वाड्यावर ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रांताधिकारी अनिल दौंडे, जिल्हा परिषद सदस्या दीप्ती भोगाडे, तनुजा घनवट, नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर, राजगुरू स्मारक समितीचे अध्यक्ष अतुल देशमुख, सुशील मांजरे, नरेंद्र गायकवाड, शैलेश रावळ, संदीप वाळुंज उपस्थित होते. राजगुरू वाड्यात दिवसभर रक्तदान शिबिर आयोजित केलेले होते. नगर परिषदेच्या वतीने गेल्या तीन दिवसांपासून विविध उपक्रमांचे आयोजन केले होते.

> **हुतात्मा शिवराम हरी राजगुरू स्मारक आणि परिसर विकास हा पुढील पिढ्यांच्या प्रेरणेचा विषय आहे. या स्मारकाचा सर्वांगीण विकास होणे म्हणजे येणाऱ्या पिढ्यांना आपल्या स्वातंत्र्यलढ्याची ओळख देणे आणि राष्ट्रप्रेमाची भावना दृढ करणे होय. निधी मिळण्यासाठी आणि स्मारकाचा दर्जेदार विकास व्हावा यासाठी मी कटिबद्ध आहे.**
>
> **बाबाजी काळे,**
> आमदार, खेड-आळंदी

पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या हस्ते वाड्यावर ध्वजारोहण करण्यात आले.

Hello Pune Gramin
Page No. 2 Mar 25, 2026
Powered by: erelego.com



डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख